UNIVERSITY OF
POONA

Jayakar Library

समाज-स्वास्थ्य

Vol. १४. Nos १-१२

Pages १-४१८.

Months जुलै - जून

Year १९४० -४१.

POONA UNIVERSITY
JAYAKAR LIBRARY

RARE-BOOK

Kept Separately

Not to be issued out

Y1m2:N27
155 F7.14
289550

वर्ष १४, अंक १ ला

# जुलै १९४०

## अनुक्रमणिका.


| | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | संपादकीय | |
| २. | आमचा खटला संपला | १ |
| ३. | अश्लीलतेचा आणखी एक खटला | ३ |
| ४. | हल्ला | ९ |
| ५. | केसरी आणि हिटलरशाही | १० |
| ६. | ग्रंथपरीक्षण | १६ |
| ७. | पत्रव्यवहार | २० |
| ८. | शारदेचें पत्र | २२ |
| ९. | दारूबंदी खलास ? | २७ |
| | | ३२ |


## वर्गणीची माहिती

हें मासिक दर महिन्याचे १५ तारखेस प्रसिद्ध होतें. कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येईल. वार्षिक वर्गणी ट. हा. सह दीड रुपया. हिंदुस्थानाबाहेरील ग्राहकांस रु. २ किंवा ३ शिलिंग. व्ही. पी. मागविल्यास चार आणे जास्त पडतील.

**पोर्तुगीज प्रांतांत व्ही. पी. पाठवणार नाहीं.**

वर्गणीबद्दल **पोस्टाचीं तिकिटें घेतली जाणार नाहींत.** पैसेच पाठवावें.

**पुणें येथील ग्राहकांनीं** प्रो. दि. धों. कर्वे, ६९-१ लॉ कॉलेज रोड, यांजकडे वर्गणी भरल्यास चालेल. किरकोळ अंकही तेथें मिळतील.

अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हांस मिळाली पाहिजे.

**इतर ग्राहकांस पत्ता:**—राइट एजन्सी,
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव मुंबई.

मागील अंकास तीन आणे, तीन अंकांस आठ आणे, नमुना फुकट अमुकच महिन्याचा अंक नमुन्याकरता मिळणार नाही.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# संपादकीय

या अंकाबरोबर या मासिकाचें १४ वें वर्ष सुरू होत आहे. प्रारंभीं कांही वर्षें यांत नुकसान झालें, परंतु तेव्हा आम्हास नोकरी असल्यामुळे तें नुकसान पगारांतून भरलें. नंतर कांही वर्षें मासिकाचा खर्च बाहेर पडत होता, कारण त्या वेळीं थोड्याबहुत जाहिराती मिळाल्या होत्या व खपहि बराच होता. नंतर जाहिराती मिळत नाहीशा झाल्या व खपहि कमी झाला व मासिकांत पुनः नुकसान होऊं लागलें. आम्हा स्वतःला जाहिरातींची खटपट साधत नाही आणि अडल्यांकडून समजलें की आमच्या मतांमुळे जाहिराती मिळत नाहीत. खप कमी होण्याचें मुख्य कारण म्हणजे फुकट वाचणारांची संख्या वाढली व कांही विक्रेत्यांनी मासिक भाड्याने देण्यास सुरवात केली. शिवाय कांही लोकांची अशीहि तक्रार आहे की मासिक पूर्वीइतकें वाचनीय नसतें. याचा अर्थ आम्ही इतकाच समजतों की कामशास्त्राची माहिती त्यांत पूर्वीप्रमाणे येत नाही. याचें एक कारण असें की ' आधुनिक कामशास्त्र ' या पुस्तकांत समाविष्ट केलेले लेख पूर्वी मासिकांत येऊन गेले, तेव्हा तें लोकांस चटकदार वाटत होतें, परंतु आतां अर्थातच तीच माहिती पुनः देतां येत नाही, यामुळे तें वाचनीय वाटत नाही. परंतु फक्त कामशास्त्रावरच लेख लिहिण्याचा आमचा कधीच उद्देश नव्हता आणि अजूनहि असे लेख येत नाहीत असें नाही.

मासिकाचा खर्च निघूं लागला तेव्हा मासिकाचीं पानें २४ होतीं, तीं नंतर २८ केलीं व नंतर ३२ केलीं, व तीं अजूनहि तितकींच आहेत. तथापि कागद महाग झाल्यामुळे इतरांप्रमाणे आम्हासहि पानें कमी करावीं लागतील असें दिसतें, कारण आम्हास आतां नोकरी नसल्यामुळे फार दिवस नुकसान सोसणें अशक्य

आहे. आमच्या वाचकांपैकी ज्यांना शक्य असेल त्यांनी आम्हास जाहिराती मिळवून देण्याची खटपट केल्यास त्यांत त्यांचा व आमचाहि फायदा होईल.

**पोस्टल ऑर्डरींचा फार्स.** पुष्कळ लोकांना साधा हिशोब कळत नाही, आणि ते टपाल खात्याच्या जाहिरातींनी फसून आमचेकडे पैसे पाठवतांना मनीऑर्डरीऐवजी ' पोस्टल ऑर्डर ' पाठवतात. यांत फायदा नसून नुकसान आहे हें त्यांच्या लक्षांत येत नाही. पोस्टल ऑर्डर विकत घेण्यास एक आणा पडतो, व नंतर ती पत्राने पाठवण्यास आणखी एक आणा पडतो. मनीऑर्डरीला देखील दहा रुपयांपर्यंत दोन आणे पडतात, परंतु हा खर्च दिसायला सारखा असला तरी मनीऑर्डरीची आपोआप पावती मिळते आणि ते पैसे पोंचण्याबद्दल शंका नसते. पत्रें बऱ्याच वेळां गहाळ होतात, यामुळे पोस्टल ऑर्डर गहाळ होण्याचा संभव असतो, आणि तिची आपोआप पावतीहि मिळत नाही. ती गहाळ झाल्यास धोका राहूं नये म्हणून ती चेकप्रमाणें ' क्रॉस ' करतां येते हें खरें, परंतु तसें केल्यास ती बँकेमार्फतच वसूल करावी लागते, आणि आमची बँक ( इंपीरिअल बँक ) ते पैसे वसूल करण्याकरतां दोन आणे आकारते. म्हणजे अशा पोस्टल ऑर्डरीला चार आणे खर्च येतो, आणि शिवाय आपोआप पावती मिळत नाहीच. नुकतीच ही अडचण आम्हीं ' पोस्ट मास्टर जनरल ' यांना कळवली होती, परंतु त्यांनी आम्हास उलट कळवलें की बँकेला मनुष्य पाठवावा लागतो तेव्हा ते साहजिकच ट्रॅमचें भाडें आकारतात. म्हणजे त्यांनाहि आमचें म्हणणें समजलें नाही. अशा रीतीने खर्च आल्यास पोस्टल ऑर्डरी घेण्यांत फायदा नसून नुकसान आहे आणि टपाल खात्याची जाहिरातबाजी फोल आहे. महिन्यांतून एकदां हिशोब चुकता करण्याची जशी बँकांची पद्धत असते, तशी व्यवस्था टपालखात्याला कां करतां येऊं नये, आणि बँकांना प्रत्येक वेळीं मनुष्य कां पाठवावा लागावा? सारांश हे दोन आणे सोडले तरीदेखील पोस्टल ऑर्डरला मनीऑर्डरीइतकाच खर्च येतो. पोस्टल ऑर्डर पत्राबरोबर पाठवतां येते ही गोष्ट खरी, परंतु मनीऑर्डरींतहि कूपनवर बराच मजकूर लिहितां येतो. तेव्हा लांबलचक पत्र लिहिणें असेल तरच त्यांत कांही फायदा आहे असें म्हणतां येईल, परंतु ती मनीऑर्डरीपेक्षा केव्हाहि कमी सुरक्षित आहे हें उघड आहे.

---

# आमचा खटला संपला

सप्टेंबर १९३८ च्या समाजस्वास्थ्याच्या अंकांत 'कामकला' नामक पुस्तकाची तीन ओळींची जाहिरात प्रसिद्ध झाली होती, ती अश्लील असल्याच्या आरोपावरून पोलिसाने आम्हास ५ एप्रिल १९३९ रोजीं अटक करून रु. ५० जामीन घेऊन सोडलें होतें. तेथपासून १ मे १९४० पर्यंत कोर्टाला वेळ न झाल्यामुळे सुमारें दर महिन्यांत एक याप्रमाणे तारखा लागून तो खटला लांबणीवर पडत आला होता. तो प्रथम गिरगांव पोलिस कोर्टाचे मॅजिस्ट्रेट श्री. खंबाटा यांजकडे होता. नंतर गिरगांवांत जादा मॅजिस्ट्रेटच्या जागेवर श्री. बरोडावाला यांची नेमणूक झाल्यावर आमचा खटला त्यांजकडे वर्ग केला. नंतर त्यांची नेमणुकीची मुदत संपून त्यांचे जागेवर श्री. बाबरेकर आले, व शेवटीं गेल्या मेच्या एक तारखेला त्यांजपुढे हा खटला निघाला. तेथपर्यंत तारीख असेल त्या दिवशीं कोर्टांत जाऊन कांहीं तासपर्यंत बसावें, आणि कोर्टाला वेळ नाही म्हणून दुसरी तारीख नेमल्यावर परत यावें असा आमचा क्रम चालू होता.

या खटल्यांत आमचेबरोबर छापखान्याचे मालक श्री. गंडभीर यांनाहि पकडलें होतें. मागील अनुभवामुळे आणि पैसेहि नसल्यामुळे या वेळीं आम्हीं वकील दिला नव्हता, परंतु श्री. गंडभीर यांचे तर्फे भाई कर्णिक काम चालवीत होते. १ मे रोजीं सरकारतर्फे सरकारी भाषांतरकार श्री. जहागीरदार यांची साक्ष झाली. त्यांनी सांगितलें की मी आज वीस वर्षे भाषांतराचें काम करीत आहें व ही जाहिरात मला अश्लील वाटल्यामुळे मी वरिष्ठ अधिकाऱ्याचे संमतीने तिचें भाषांतर करून त्यासंबंधी खटला करण्याकरतां तें पोलिसाकडे पाठवलें. हें भाषांतर अत्यंत गचाळ होतें, तथापि त्यांत विशेष आक्षेप घेण्यासारखें कांही नव्हतें आणि शिवाय मॅजिस्ट्रेटसाहेबांची भाषा मराठीच असल्यामुळे त्यास विशेष महत्वहि नव्हतें. आम्हीं या साक्षीदाराची फेरतपासणी करण्याचें नाकारलें, परंतु श्री. कर्णिक यांनी फेरतपासणींत त्यांस असें कबूल करायला लावलें की ही सबंध जाहिरात अश्लील म्हटली तरीसुद्धां त्यांतील

'अप्राकृतिक संभोग' हे शब्द काढून टाकले तर ती अश्लील होणार नाही. शिवाय 'अप्राकृतिक' हा शब्द सामान्य वाचकाला कळण्यासारखा नाही, असेंही त्यांनी कबूल केलें. इतकें झाल्यावर खटला १७ मे पर्यंत तहकूब झाला.

या दिवशीं सी. आय्. डी. चे इन्स्पेक्टर देसाई यांची ठरींव पद्धतीची साक्ष झाली. परंतु आमचे मासिकास कांही वर्गणीदार आहेत किंवा तें कोठें विकलें जातें हें सिद्ध न झाल्यामुळे १४ जूनपर्यंत खटला पुनः तहकूब झाला. ही साक्ष मामुली स्वरूपाची असल्यामुळे फेरतपासणी झाली नाही.

१४ जून रोजीं आमचे मासिकाचे त्या वेळचे मुंबईतील एजंट श्री. निमकर यांची साक्ष झाली, आणि तीवरून आमचें मासिक मुंबईंत विकलें जातें असें ठरलें. अर्थात् हें आम्हास कबूलच असल्यामुळे येथेहि फेरतपासणीची जरूर नव्हती.

नंतर पोलीसचे वकील श्री. झाबवाला यांचें सरकारतर्फे भाषण झालें. त्यांत त्यांनी सांगितलें की या जाहिरातींत जरी अश्लील शब्द नसले तरी तिचा एकंदर अर्थ पाहतां ती अश्लील आहे असें म्हणावें लागतें, कारण तींत 'अप्राकृतिक संभोग' असे शब्द असून पुस्तक एकांतांत वाचण्याजोगें आहे असें सांगितलें आहे. यावर मॅजिस्ट्रेटांनी प्रश्न केला की यापेक्षाहि वाईट जाहिराती पुष्कळ असतात आणि मीं एका धार्मिक पत्रांत देखील अशा जाहिराती पाहिल्या आहेत, त्या कशा चालतात? यावर श्री. झाबवाला यांस कांही उत्तर देतां आलें नाही, तथापि ही जाहिरात एकंदरींत अश्लील आहे असें म्हणून त्यांनी आपलें भाषण संपवलें.

यानंतर आमची बोलण्याची पाळी होती. आम्हीं एक लेखी कैफियत लिहून नेली होती व शिवाय 'ज्ञानप्रकाश' व 'दैनिक लोकशक्ति' या पत्रांतील 'कोकशास्त्र' या पुस्तकाच्या जाहिरातींचीं कातरणें नेलीं होतीं. परंतु हें सर्व कोर्टास सादर न करतां त्याचे आधारानें बचावाचें भाषण करण्याचा आमचा विचार होता. परंतु हीं कातरणें कोर्टापुढे नाहीत, तेव्हा त्यांचा उल्लेख करतां

येणार नाही, असें कोर्टाने सांगितल्यावरून आम्हीं शेवटीं लेखी कैफियत व तीं कातरणें कोर्टास सादर केलीं, व नंतर भाषण केलें. या लेखी व तोंडी जबाबाचा सारांश पुढीलप्रमाणेः—

मी अश्लीलतेचा कायदा कोणत्याही प्रकारें मोडलेला नाही. कायद्यांत अश्लीलतेची व्याख्या दिलेली नाही आणि त्यावरील टीकांत फक्त वेगवेगळ्या न्यायाधिशांनी त्याचा कसा अर्थ केला एवढेंच दिलें आहे. या जाहिरातीची भाषा पाहिल्यास तिला कोणीहि समंजस मनुष्य अश्लील म्हणणार नाही. श्री. जहागीरदार यांनी आपल्या साक्षींत कबूल केलें की या जाहिरातींतील 'अप्राकृतिक संभोग' हे शब्द काढून टाकल्यास ती अश्लील होणार नाही. परंतु 'अप्राकृतिक संभोग' यांत तरी अश्लील काय आहे? कामशास्त्राची संपूर्ण माहिती देणाऱ्या कोणत्याहि ग्रंथांत अनैसर्गिक संभोगाचा उल्लेख येईल, परंतु तो केवळ हा प्रकार अनिष्ट आहे असें सांगण्यापुरताच येईल, कारण तो इष्ट आहे असें म्हणण्याचें धाडस कोणीहि लेखक करील असें वाटत नाही. तेव्हा याचा केवळ उल्लेख अश्लील म्हणतां येणार नाही.

अश्लील म्हणण्यासारखें या जाहिरातींत दुसरें कांही आहे काय? पुस्तक एकांतांत वाचावें असें सांगितलें आहे. स्नान देखील एकांतांत करतात, म्हणून स्नानाचा उल्लेख अश्लील होईल काय? त्या पुस्तकांत चित्रें आहेत असें म्हटलें आहे, परंतु तीं चित्रें आकर्षक आहेत इतकेंच म्हटलें आहे. संभोगासनांचीं चित्रें अश्लील समजतात, परंतु हीं तशीं चित्रें नाहीत. संभोगासनांचा उल्लेख आहे, परंतु आसनांचीं वर्णनें पुष्कळ सर्वमान्य ग्रंथांत असतात, आणि त्या ग्रंथांना कोणी अश्लील म्हणत नाही.

तरमग या जाहिरातीला अश्लील म्हणून माझ्यावर हा खटला कां केला? याचें कारण कांही वेगळेंच असलें पाहिजे. श्री. जहागीरदारांना ही जाहिरात अश्लील वाटली असें ते म्हणोत, परंतु यापेक्षा 'अश्लील' जाहिराती नेहमी त्यांच्या डोळ्यांखालून जातात, आणि त्यांवर ते आक्षेप घेत नाहीत असें मी

सिद्ध करतों. अशा दोन जाहिरातींचीं कातरणें मी येथे आणलीं आहेत, आणि तीं ' ज्ञानप्रकाश ' व ' लोकशक्ति ' यासारख्या सन्मान्य पत्रांतील आहेत. या जाहिराती मला अटक करण्याच्या पूर्वीहि त्यांत येत होत्या, व अजूनहि येत आहेत. ' ज्ञानप्रकाश ' हें ' सर्व्हंट आफ इंडिया ' नामक सन्मान्य संस्थेचें मुखपत्र आहे, आणि ' लोकशक्ति ' हें कांग्रेसच्या एका प्रमुख सभासदाच्या मालकीचें आहे. या दोन्ही जाहिराती ज्या पुस्तकाच्या आहेत, त्यांत ८४ आसनांचीं अद्‌भुत रंगीत चित्रें आणि सभ्य भाषेंत न सांगण्यासारख्या कांही गोष्टी असल्याचा उल्लेख आहे. या जाहिरातींचा आकार इतका मोठा आहे आणि त्या इतके दिवस एकसारख्या येत आहेत, की त्या केवळ नजरचुकीनें श्री. जहागीरदार यांना दिसल्या नसतील हें संभवत नाही. तरमग माझ्या मासिकांतील लहानशी तीन ओळींची जाहिरात तेवढी त्यांना आक्षेपार्ह कां वाटली ? यावरून मला हें उघड दिसतें की श्री. जहागीरदार किंवा त्यांच्यामागे लपलेला आणखी कोणीतरी मनुष्य कांही अंतःस्थ हेतूने मला गोत्यांत आणण्यास टपलेला होता, आणि त्याला यापेक्षा दुसरा मार्ग सांपडला नाही. अश्लीलतेचा कायदा इतका संदिग्ध आहे की त्याखाली असले वाहियात खटले होऊं शकतात. माझ्याविरुद्ध असलीं कारस्थानें करणारे लोक कां असावे याला एक सबळ कारण आहे. मी समाजसुधारणेच्या दृष्टीने सनातनी मतांवर कडक टीका करीत आलों आहें आणि पुष्कळ वेळां कॅांग्रेसविरुद्धहि टीका केली आहे. या टीकेने लोक चिडतात आणि अशा रीतीने आपण नामानिराळे राहून मला गोत्यांत आणूं पाहतात. दुसऱ्या ज्या दोन पत्रांतलि जाहिराती मीं दाखवल्या, त्यांपैकी एक तर कॅांग्रेसचें आहे आणि मला अटक केली त्या वेळीं कॅांग्रेस अधिकारारूढ होती. दुसरें पत्र ' ज्ञानप्रकाश ' हें कधीहि कोणावर कडक टीका न करणारें पत्र आहे, तेव्हा त्यावर कोणी चिडत नाही हें साहजिक आहे. यामुळे या पत्रांनी संभोगासनांच्या चित्रांच्याहि जाहिराती छापलेल्या चालतात आणि अशा चित्रांचा संबंध नसलेली माझ्या मासिकांतील जाहिरात मात्र अश्लील वाटते !

# आमचा खटला संपला

कायद्याच्या या कलमाचा अर्थ करण्याचे बाबतींत मुंबई हायकोर्टाने १९१२ सालीं 'विष्णु कृष्ण पुराणिक' यांजविरुद्ध केलेल्या खटल्यांत एक महत्वाचें तत्व घालून दिलेलें आहे. त्या खटल्यांतील विद्वान न्यायाधिशांनी आपल्या निकालांत म्हटलें आहे की आक्षिप्त मजकुराचा अर्थ पाहण्यापेक्षा त्याची भाषा पाहणें अधिक महत्वाचें आहे, कारण एकच अर्थ अश्लील भाषेंत सांगतां येईल किंवा अत्यंत सभ्य भाषेंतही सांगतां येईल. हें तत्व या जाहिरातीला लावल्यास तिला अश्लील म्हणणें शक्य नाही. तींतील भाषा इतको सभ्य आहे की कोठे कोठे ती धड समजतही नाहीं. 'अप्राकृतिक' हा शब्द मराठी भाषेंत या पूर्वी किंवा नंतरहि कोणीं वापरला असेल असें वाटत नाही, आणि सभ्यतेची कसोटी हीच असते की इंग्रजी लिहित असल्यास लॅटिन शब्द वापरायचे, आणि मराठी लिहीत असल्यास संस्कृत शब्द वापरायचे, म्हणजे सामान्य लोकांना ते कळूं नयेत. या जाहिरातींतून कांहीं 'अश्लील' अर्थ काढायचा झाल्यास कल्पनाशक्तीचा बराच उपयोग करावा लागतो, आणि तसा करायचा झाल्यास 'अमुक माणसांचा विवाह होणार आहे' हा मजकूर सुद्धां 'अश्लील' होईल, कारण विवाहाचे परिणाम कल्पिल्यास ते 'अश्लील' आहेत ! याकरतांच एका इंग्रज लेखकाने लिहिलें आहे कीं अशा तऱ्हेने 'नॉटिकल आल्मनॅक' किंवा 'टेलिफोन डायरेक्टरी' यांशिवाय कोणताहि ग्रंथ अश्लील ठरेल. मी तर असेंहि म्हणतों कीं टेलिफोन डायरेक्टरींतहि कांही अश्लील नांवें सांपडतील, तेव्हा तीहि अश्लील ठरेल.

अश्लीलतेचा कायदा इतका संदिग्ध आहे आणि यामुळे मॅजिस्ट्रेट कशाला अश्लील म्हणतील याचें भाकित करणें इतकें अशक्य असतें, की आमच्यासारख्या सामान्य माणसांना वागण्याचा एकच मार्ग दिसतो की इतर प्रतिष्ठित लोक काय करतात तें पाहून त्याप्रमाणे वागणें. आतां मीं जीं जाहिरातींचीं कातरणें दाखवलीं तीं 'ज्ञानप्रकाश' व 'लोकशक्ति'सारख्या सन्मान्य वर्तमानपत्रांत ज्या अर्थी येऊं शकतात, त्याअर्थी त्यापेक्षा अत्यंत सौम्य जाहिरात माझ्या मासिकांत आल्याबरोबर ती अश्लील होईल हें मी कसें मानावें ? तेव्हा अश्लीलतेचा कायदा

मोडल्याचा आरोप मजवर बिलकूल शाबीत होत नाही असें माझें म्हणणें आहे.

यानंतर श्री. कर्णिक यांचें श्री. गंडभीर यांचे तर्फे भाषण झालें. त्यांत त्यांनी सांगितलें की छापखान्याचा मालक छापायला आलेला सर्वच मजकूर वाचून पाहतो असें नाही आणि ही एवढीशी जाहिरात त्यांचे नजरेंतून सुटली तर नवल नाही. शिवाय या जाहिरातीची भाषा पाहतां त्यांत कांही अश्लील दिसत नाही. ' कामकला ' हें पुस्तकाचें नांव आहे, तें अश्लील म्हणतां येणार नाही, कारण याच अंकाच्या बाहेरच्या पानावर 'आधुनिक कामशास्त्र' या पुस्तकाची जाहिरात आहे, तिला आक्षेप घेतलेला नाही. हें मासिक कामशास्त्राला वाहिलेलें आहे. अशा मासिकाच्या वाचकांवर या जाहिरातीचा मोठासा वाईट परिणाम होणें शक्य नाही. शिवाय आज तेरा वर्षे चालू असलेल्या आणि सरकारने चालूं दिलेल्या मासिकाच्या ४४ पृष्ठांपैकी एक बारीकशी तीन ओळींची जाहिरात घेऊन तिच्यावर आक्षेप घेतला जातो याला काय म्हणावें हें मला समजत नाही.

येथे खटला खलास होऊन निकालाकरतां २४ जून तारीख नेमली व त्या दिवशीं पुढील प्रमाणें निकाल सांगण्यांत आला.

( सारांश )" आक्षिप्त मजकूर म्हणजे ' कामकला ' नांवाच्या पुस्तकाची तीन ओळींची जाहिरात सप्टेंबर १९३८ चे समाजस्वास्थ्याचे अंकांत छापलेली आहे ती होय. तींत जरी एकही अश्लील शब्द नाही, तरी त्या जाहिरातीचा एकंदर अर्थ लक्षांत घेतां ती अश्लील आहे, असें त्या जाहिरातीचे सरकारी भाषांतरकार श्री. जहागीरदार व सरकारी वकील यांनी सांगितलें. यावर आरोपीचें म्हणणें असें की कायद्यांत अश्लीलतेची व्याख्या दिलेली नाही आणि या जाहिरातींत अत्यंत सभ्य भाषा वापरलेली असून त्यांत अश्लील असें कांही नाही. शिवाय यापेक्षाही वाईट अशा जाहिराती इतर वर्तमानपत्रांत येत असतात असें दाखवण्याकरतां त्याने दोन कातरणें कोर्टास सादर केलीं आहेत. त्याही अशाच जातीच्या पुस्तकांच्या जाहिराती आहेत आणि एकंदरींत अशा जाहिरातींची एक ठराविक भाषा असते तशीच आक्षिप्त जाहिरातीचीहि भाषा आहे. इतर तशाच जाहिरातींबद्दल फिर्याद

केलेली नाही म्हणून हीहि अश्लील नाही, असें जरी म्हणतां येत नाही, तरी या बाबतींत प्रचलित स्थिति काय आहे हें पाहणें जरूर आहे, आणि या दृष्टीने पाहतां या जाहिरातीच्या भाषेला अश्लील म्हणतां येत नाही. आरोपीच्या म्हणण्याप्रमाणे कायद्यांत अश्लीलतेची व्याख्या दिलेली नाही हें खरें असलें, तरी जस्टिस कॉकबर्न यांनी या कायद्याचा केलेला अर्थ सर्वमान्य आहे (जे लोक बिघडण्याचा संभव असेल असे लोक ज्याच्या वाचनाने बिघडतील तें अश्लील). या व्याख्येच्या दृष्टीने पाहतां या जाहिरातीला अश्लील म्हणतां येईलच असें नाही, तेव्हा मी आरोपीस संशयाचा फायदा देऊन आरोपमुक्त करतों. मात्र आरोपीचें जें म्हणणें आहे की हा आरोप कोणीतरी द्वेषाने केलेला आहे, त्यांत मला विशेष अर्थ दिसत नाही."

आम्हास हा आरोप द्वेषमूलक कां वाटतो हें आम्ही समर्पक रीतीने दाखवलें आहे व आमचें अनुमान अपरिहार्य आहे असें आम्हास वाटतें. मॅजिस्ट्रेटसाहेबांस आमचें म्हणणें कां पटत नाही याची कारणमीमांसा आम्ही करीत बसत नाही, परंतु आमची मात्र या बाबतींत खात्री आहे. जस्टिस कॉकबर्न यांनी केलेला अर्थ म्हणजे एक अनर्थच आहे आणि निकाल कोणताहि देणें असो, त्या अर्थाचा उच्चार प्रत्येक न्यायाधीश मंत्राप्रमाणे करून नंतर पाहिजे तो निकाल देत असतो. त्याप्रमाणेच या वेळींहि झालें आहे. याविषयी जास्त लिहिण्याचें कारण नाही.

---

## अश्लीलतेचा आणखी एक खटला

करजत येथील श्री. ग. र. मुळे यांनी अनंगरंग-रतिशास्त्र या नांवाचें एक कामशास्त्राचें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. १९३६ सालीं हें पुस्तक अश्लील ठरवण्याकरतां मुंबई सरकारने श्री. मुळे यांजवर खटला केला होता. तो खटला सुमारें वर्षभर चालून त्या वेळचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. खंडाळावाला यांनी श्री. मुळे यांना दंडाची शिक्षा केली होती, व तें पुस्तक जप्त करण्याचा हुकूम केला होता.

या खटल्यामुळे श्री. मुळे यांनी आपलें धैर्य खचूं न देतां त्या पुस्तकाची पुन्हा जाहिरात देऊन उघडपणें विक्री सुरू केली. या वेळीं त्यांच्या मित्रांनी ' विषाची परीक्षा पाहूं नको ' असें नाना तऱ्हांनी श्री. मुळे यांस सांगितलें होतें. परंतु हा खटला आपण जिंकूं अशा आत्मविश्वासाच्या जोरावर श्री. मुळे यांनी हा दुसरा खटला आपणावर ओढवून घेतला, व मोठ्या धैर्यानें व चिकाटीनें या खटल्याला तोंड देऊन अश्लीलतेचा बुरूज फोडला व खटला जिंकला. हा खटला १९३७ सालीं भरला होता, व अनेक तारखा चालून तो १९४० च्या जून महिन्यांत संपला. ' हें पुस्तक शास्त्रीय असून तें फक्त विवाहितांनाच विकलें जातें, किंमत जास्त असल्यामुळे त्याची विक्रीहि मर्यादित केलेली होती, तसेंच हें पुस्तक अश्लील आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारी वकिलावर असून त्यांनी ती पार न पडल्यामुळे मी आरोपी श्री. मुळे यांना पूर्ण निर्दोष ठरवून सोडून देतों,' अशा आशयाचा निकाल प्रेसि. मॅजिस्ट्रेट श्री. ऑस्कर ब्राऊन यांनी दिला. असे दीर्घकाल चालणारे खटले शेवटपर्यंत भांडण्याकरतां कल्पने-बाहेर दगदग व आर्थिक अडचणी सोसाव्या लागतात. अशा परिस्थितींत श्री. मुळे यांनी दाखवलेलें धैर्य वाखाणण्यासारखें आहे. हा खटला येथील ॲडव्हो-केट श्री. वि. ज. उर्फ बाळासाहेब घारपुरे, एम्. ए., एल् एल्. बी. यांनी अखेर-पर्यंत चालवला व अश्लीलतेची सूक्ष्म छाननी आपल्या दहा तासांच्या बचावाच्या भाषणांत उत्तम तऱ्हेने केली. हा खटला जिंकल्याबद्दल उभयतांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

---

# हल्ला

लेखक, सहृदय, महाड.

मी आणि माझी ताई – एकमेकांवर मनापासून प्रेम करीत असूं.

मला कळत नव्हतें तेव्हा तिचें लग्न होऊन गेलें होतें. ती चांगल्या ठिकाणीं पडली होती, पण तिच्या दुर्दैवानें तिच्यावर मोठा आघात केला. 'पति'

म्हणून कोणीतरी जिवाभावाची अशी अत्यंत आवडती व्यक्ति असूं शकते, हें तिला कळायला लागण्यापूर्वीच तिच्यावर वैधव्य कोसळलें. तेव्हापासून ती आमच्याच घरीं रहात होती.

मला थोडेंसें कळायला लागलें तेव्हापासून मी ताईच्या वागण्यांतील फरक समजून घेण्याचा प्रयत्न करूं लागलों. कांही गोष्टींत ती मला मोकळेपणाने उत्तरें देई, कांही गोष्टींत ती बोलण्यासही तयार नसे. त्यामुळे मला विशेष कांही तिच्या मनाला बोंचणारे प्रश्न तिला विचारण्याचें धैर्य होत नसे.

ती माझी ताई होती, आणि बऱ्याच अर्थाने आई पण होती. पण आई-जवळ मी ज्या औद्धत्याने वागूं शकत असें, त्याच वृत्तीने मला ताईशीं वागतां येत नसे तसें पाहिलें तर तिच्या व माझ्या वयांत जवळजवळ वीस वर्षांचें अंतर होतें ताई आमच्या घरीं तशी दिसायला आनंदांत वागे, हंसे. पण तिच्या मनाला वाटणारें दुःख ती माझ्यापासून दडवूं शकत नव्हती. तिचें तें दुःख मला जाणून घ्यायची इच्छा होई.

माझ्या लहानपणीं ताईच्या खोलींत तिच्या पतीचा फोटो होता. तो तिने तेथून केव्हा हालवला हें मात्र मला आठवत नव्हतें, कारण माझें त्या गोष्टीकडे अलीकडेच लक्ष गेलें होतें. मीं एक निसर्गाचें सुंदरसें चित्र पुण्याहून येतांना आणलें होतें. तें मी ताईच्या खोलींत टांगण्यासाठीं गेलों, आणि मुद्दाम त्या एकाच खुंटीकडे गेलों, आणि तेथे तें कसें दिसतें हें पहात, जाणून बुजून पण ताईला सहजगत्या वाटेल अशा स्वरांत विचारलें, ' ताई येथला पूर्वीचा फोटो कोठें आहे ग ? ' ताई कांहीच बोलली नाही, की त्या आठवणीने दुःखी होऊन तिने श्वासहि सोडला नाही. मी म्हटलें ' कां ग, बोलत नाहीस ? '

' काय बोलूं ? उगीच जुन्या आठवणी काढून रडत बसूं ? ' अगदीं सौम्य स्वरांत आणि कांहीशा बेपर्वाईने तिने मला उत्तर दिलें.

आपल्या मृतपतीचा फोटो पाहून उगाच दुःखी होण्यांत काय अर्थ, असें ताईला वाटत असावें म्हणून तिने तो फोटो तेथून हालवला असावा, असें मीं

समाधान मानून घेतलें. पण त्या योगें माझ्या मनाची रुखरुख कांही केल्या कमी होईना. ताईच्या वागण्यांतील फरक, चेहऱ्यावरील संवेदना आणि भावनोर्मि मला निराळ्याच वाटत होत्या. मला अलीकडे संशय येऊं लागला होता. माझें तरुण मन जिज्ञासु होतें. हें मी कबूल करतों, पण ती जिज्ञासा वाढण्यास आणखी एक कारण होतें. माझ्या आवडत्या ताईच्या दुःखाचें मूळ शोधून तें नाहीसें करतां आलें तर करावें असें मला मनापासून वाटे. शिवाय माझ्या ताईने माझ्याशीं कोणत्याहि गोष्टींत गुप्तता ठेवावी हें मला आवडेना.

मी माझ्या मनांतील भावना तिच्याजवळ अगदीं मोकळ्या मनाने व्यक्त करीत असें. आमच्या शाळेंत पूर्वी एक चुणचुणीत गुजराथी मुलगी येत असे, ती मला फारफार आवडत असल्याचें मी तिला सांगितलें होतें. तिने हंसूनच माझी हकीकत ऐकून घेतली होती. ' बापू, तूं अजून लहान आहेस. आपण ब्राह्मण आहोंत, बाळ ! '

मी तिच्या उत्तराने कष्टी झालों हें पाहून तिने मला गुदगुल्या केल्या आणि मी मनापासून हंसेपर्यंत तिने मला सोडलें नाही. मी आतां इंटरमधें होतों. मी त्या मुलीला विसरलों होतों, हेंहि मी ताईला सांगितलें. 'शहाणा आहे आमचा बापू,' एवढेंच ती उद्गारली.

पण माझी ताई ? तिचें काय एवढें गुपित असावें ? कदाचित् नसेलहि, परंतु माझें मन कांही स्वस्थ बसेना.

आमचे एक दूरचे मामा आमच्याकडे कधीकधी येत असत. त्यांच्या नातेवाईकांपैकी आमच्याच घराण्याकडे त्यांचा विशेष ओढा होता. त्यांची पत्नी बऱ्याच वर्षांपूर्वी निवर्तली होती. त्यांनी आपलें आयुष्य संन्यस्तवृत्तीने घालवण्याचा विचार करुन त्याप्रमाणे ते मोक्षप्राप्तीच्या मार्गाला प्रामाणिकपणें लागले होते. ते बहुतेक दरवर्षी कोठे तरी लांबच्या प्रवासाला जात, आणि कधी लहर लागली म्हणजे ते आमच्याकडे येत, चारदोन दिवस रहात, आनंदाने खातपीत, आणि निघून जात. ते आमच्या घरीं आले म्हणजे आम्हा

मुलांशीं अगदीं आपलेपणाने वागत. लहान–मोठा, असा त्यांनी केव्हाहि भेद केला नाहीं. ते असत तोंपर्यंत आमचें घर आनंदाचें माहेरघर बने. त्यांचें वाचन आणि अनुभव दांडगे होते. राजकारणाविषयींचे त्यांचे विचार अचूक असत. ते एखाद्या विषयाची तात्त्विक चर्चा करूं लागले म्हणजे त्यांची प्रगाढ विद्वता प्रकर्षाने चमकूं लागे, आणि सर्वांना त्यांचेविषयी आदर वाटे. स्वतः संन्यस्तवृत्तीने वागत असूनहि कौटुंबिक जीवनाचा—मुलांबाळांचा—त्यांनीं कधीहि तिटकारा केला नाही. गृहस्थाश्रमांतहि आनंद आहे, असें त्यांनी एकदा बोलून दाखवलें होतें. वृत्तीने पण ते जन्मतःच खिलाडू होते.

ते आमचे मामा येणार असल्याचें बरेच दिवसांनी आम्हाला पत्र येतांच मला आनंद झाला. तसाच इतरांबरोबर ताईलाहि झाला. ' कोणत्या वारीं येताहेत रे ? ' तिने सहजच म्हणून विचारलें.

' येत्या गुरुवारीं. ' माझें उत्तर ऐकून ती कांहीतरी कामाचें निमित्त करून आपल्या खोलींत निघून गेली. मीं तें पत्र आईला वाचून दाखवलें, आणि केवळ सहज म्हणून ताईच्या खोलींत शिरलों. तों ताई आपल्या बैठकीवर बसून समोरच्या गादीच्या वळकटीवर आपल्या दोन्ही हातांवर डोकें टेकून सचिंत बसली होती. मीं म्हटलें 'कां ग !' मामा येणार म्हणून आम्ही सर्वांनी आनंदांत असायचें आणि ताई अशी कष्टी कां ?

' कांही नाही. '– ' मग अशी कां ' ?–' उगीचच. '

मीहि जास्त लांबण लावली नाही, आणि ती गोष्ट मीं फारशी मनाला लावूनहि घेतली नाही. आमचे मामा आले, ते सहा दिवस आम्हाला जणूं सणाचे वाटले. ताईहि आमच्या आनंदांत निःसंकोच सामील झाली होती. अखेर आमचे मामा निघूनहि गेले.

त्या दिवशीं रात्रीं मी माझ्या खोलींत बराच वेळ वाचीत पडलों होतों. कंटाळा आला म्हणून पलीकडच्या मोरीवर जाऊन मी हातपाय धुतले, डोळ्यांना पाणी लावलें, आणि परतलों. तों जिन्याच्या तोंडाशीं असलेल्या ताईच्या खोलींत

तांब्या–पेला वाजला. ती पाणी प्यायली असेल असें मनांत येऊन मी जाऊं लागलें, तों तिचा एक दीर्घ श्वास माझ्या कानावर आला. मी तिला दार उघडण्यास सांगितलें. मी आंत शिरलें. ' ताई, तूं रडत होतीस ? '

' हो. ' अगदी निर्धाराचा तिचा शब्द ऐकून मी चकितच झालें. ताईला रडतांना मी तरी पाहिलें नव्हतें, आणि आतां तर तें ती कबूलच करीत होती. मी म्हटलें ' काय झालें ? '

' काय सांगूं ? ' तिला पुनः एकदां उमाळा आला. मी तिला शांत होऊं दिलें, तिला तिच्या वळकटीवर नेऊन बसवलें, तिच्या केंसांवरून हात फिरवीत तिला शांत केली. मी उठून तिला पाणी प्यायला दिलें आणि तिच्या डोळ्यांना पण थोडेंसें लावून त्यांच्यावरचा ताण कमी केला. अगदी जरूरीपुरता विषयपालट करून, किंचित् विनोदहि करून, मीं तिला विचारलें ' हं सांग आतां काय तें. '

तिनेहि आपली हकीकत मला सांगण्याचा निश्चय केला होता असें दिसलें. ' ऐक. तुझ्या स्वप्नांतहि येणार नाही अशी गोष्ट मी सांगणार आहें तुला. –आज मामा गेले ना, त्यांच्यावर माझें अगदी मनापासून प्रेम आहे. '

मला काय वाटतें हें पाहण्यासाठी ती माझ्याकडे निरखून पाहूं लागली. माझ्या तोंडावर प्रचंड आश्चर्याशिवाय तिला दुसरें कांही दिसलें नाही. मलाहि धक्काच बसला.

''गेलीं अकरा वर्षें मी आपल्या मनाशीं झगडा करीत आलें आहें. त्यांचा बोलबाला, विद्वत्ता, सद्वर्तन, मायाळू स्वभाव, आनंदी वृत्ति, वगैरे आकर्षणांनी मला त्यांच्याकडे खेंचून नेण्यास फार दिवस लागले नाहीत. थांब, एक प्रसंग सांगतें, म्हणजे तुला शंका येणार नाही. माझें मनोगत व्यक्त केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें हें मला पुरतेपणीं समजण्यास वेळ लागला नाही. एका भयाण रात्रीं मी सहज म्हणून ' पाय दडपूं का ? ' असें विचारून त्यांचे पाय दडपूं लागलें. त्यांनी मला विरोध केला...आणि त्या रात्रीं आमचें

खूप बोलणें झालें. मी आपलें प्रेम त्यांना बोलून दाखविलें, त्यांनी आमच्या लग्नाला मूलग्राही विरोध दाखवला. आणि होतां होतां त्या मुक्कामांत त्यांनी मला खूप ' वळणावर ' आणण्याचा प्रयत्न केला, आणि माझ्या हृदयाला भिडणाऱ्या तात्विक आणि सात्विक भूमिकेवर त्यांनी मला आणून सोडलें. आणि होतां होतां मींहि कबूल केलें की लग्न करायचें तें केवळ एका उत्तम पुरुषाचा सहवास हवा म्हणून करायचें होतें. कोणत्याहि तऱ्हेची सुखलोलुपता माझ्या मनांत नव्हती, हेंही मीं त्यांच्याजवळ बोलून गेलें. होय, मामांनीं मला नकार दिला तें त्यांना आपल्या संन्यस्त वृत्तीचा–त्यागी भूमिकेचा—त्याग करायची मनापासून इच्छा नव्हती म्हणून, हें खरें. काय म्हणून त्यांनी माझ्यासाठी आपल्या कल्पनेप्रमाणे आपलें आयुष्य जास्त घोटाळ्यांत पाडावें ? मला तें पटलें. मी पुनः अशा गोष्टी मनांत आणणार नाही, असें त्यांना शपथेवर सांगितलें. त्याला इतके दिवस लोटून गेले, मी आपल्या मनाची प्रतारणा केली, मामांजवळ खोटें बोललें. पण ते मात्र समजून आहेत की ' ताई ' इतक्या दिवसांच्या विचाराने–त्यांचे सद्विचार ऐकून घेऊन–खरोखर संन्यस्त बनली आहे. पण बापू, वेड्या, तें सर्व खोटें आहे. त्यांना नि तुम्हां सर्वांना मी तसें दाखवीत आलें आहें नुसतें. तो त्यांचा भ्रम तसाच राहूं देण्यांत मला आनंद आहे. "

" मामांची तूं फसवणूक करीत आहेस म्हणून तुला वाईट वाटतंय ताई आज ? " मी मध्येच विचारलें.

" नाही, तुझी फसवणूक मी करीत नाही बापू. ऐक. मामा आपल्या घरीं कायमचे रहावेत, सदासर्वदा माझ्या आवडीचे पुरुषोत्तम माझ्या नजरेसमोर असावेत, असें वाटत असतें मला नेहमी. म्हणून ते आले, किंवा ते यायचें कळलें, की रुखरुख लागते मनाला, की केव्हा एकदां ते येतील घरीं, नि केव्हां त्यांना डोळे भरून पाहीन. पण ते प्रत्यक्ष घरीं आले, आणि आपणां सर्वांशीं मोकळेपणाने वागूं लागले, म्हणजे माझ्या दाबलेल्या वृत्ति उसळून येतात आणि ते माझ्या एकटीच्या सहवासांत राहतील तर बरें असें वाटूं लागतें, आणि माझी लोलुपवृत्ति जास्त बावचळते, आणि मी वेडी, दिवाणी होतें. हें मामांना माहीत

आहे की नाही कोणाला ठाऊक, पण मला ते असेपर्यंत नको हा जीव असें होतें, आणि त्यापेक्षा ते आपल्या घरीं न येतील तर बरें असेंहि मनांत येतें. कारण, बापू, ते जातांना माझ्या हृदयाचा एवढा मोठा लचका तोडून घेऊन जातात, कीं तें सांधतांना मला महिनेच्या महिने त्रास, मनस्ताप, यातना, सहन कराव्या लागतात, भयंकर संयमन करावें लागतें. नंतर कांही दिवसांनी, मामा केव्हा पुनः येतील असेंहि वाटायला लागतें. पण आतां या वेळीं मात्र असें वाटतंय की मामांनी येथे कधीहि येऊं नये, आणि माझ्या हृदयावर जबर हल्ला करून माझें हृदय तोडण्याचा क्रूरपणा करूं नये. त्यांच्या तात्विक जीवनाला फार तीव्र धार आहे.—चुकलें बापू, ते नाहीत क्रूर, ते फारच चांगले आहेत, मीच दुष्ट. एवढें वय झालें तरी मी आपलें तारुण्य विसरूं शकलें नाहीं, हा माझा दोष आहे. मी किती खुळी आहें नाही रे? खरें सांग रे, बापू. मीं तुला खरें सांगितलें म्हणून तूं माझा तिरस्कार नाहीं ना करणार? मला खुळी नाहीं ना म्हणणार?"

# केसरी आणि हिटलरशाही

केसरीची वाढ प्रथमपासूनच कुटिलनीतीवर झालेली आहे आणि 'टिळकांचा केसरी मेला' असें जरी प्रो. फडक्यांनी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून नुकतेंच सांगितलें, तरी हल्लीचे संपादक देखील कुटिलपणा कायम ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत यांत शंका नाही. अर्थात् केसरीचा संपादक होण्याने टिळकांची अक्कल येत नाही, तेव्हा हा प्रयत्न तितका यशस्वी होत नाही. परंतु कोणी झाला तरी प्रयत्न करण्यापलीकडे काय करणार?

या कुटिलपणाचा एक मासला २८ जूनच्या अंकांतील अग्रलेखांत पहायला सांपडतो. यांत संपादकांनी फ्रान्सच्या पराजयाची जी मीमांसा केली आहे, ती केवळ येन केन प्रकारेण स्वतःचीं बुरसट मतें सिद्ध करण्याच्या हेतूनेच केलेली आहे, पण अर्थातच तो हेतु सफल झालेला नाही. आणि कसा होणार? कांही

बरेंवाईट होईल त्यावरून ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न जसा आस्तिक लोक करीत असतात, त्यांतलाच हा प्रकार आहे. पण जें नाहीच तें सिद्ध कसें होणार ?

केसरीचा मुख्य आधार आहे मार्शल पेतँ अमुक म्हणाले यावर. परंतु मार्शल पेतँ यांचें म्हणणें खरेंच असलें पाहिजे असें कोणी सांगितलें ? मार्शल पेतँ म्हणाले, ' फारच थोडीं मुलें, फारच थोडीं शस्त्रास्त्रें, व फारच थोडे दोस्त, हें आमच्या पराभवाचें कारण आहे. १९१८ सालीं आमच्या राष्ट्राला विजय मिळाला तेव्हापासून त्यागाच्या वृत्तीपेक्षा सुखोपभोगाच्या वृत्तीला आमचे लोक जास्त मान देत आले आहेत...'

हें म्हणणें वेदवाक्य मानून त्यावरून संपादकमहाराज अनुमान काढतात की फ्रान्समधील परिस्थिति बिघडलेली आहे, आणि त्याची मीमांसा अशी करतात की ' मार्शल पेतँ म्हणतात त्याप्रमाणें त्याग आणि कष्ट करणें याची संवय सुटून सुखोपभोगाची लालसा वाढत चालली आणि चैनीची संवय लागली की समाजाच्या व राष्ट्राच्या हिताकडे दुर्लक्ष होऊन कृत्रिम संततिनियमनासारखीं खुळ बोकाळतात, आणि मग शत्रूशीं लढण्याचा प्रसंग आल्यावर संतति कमी म्हणून लष्करांत भरती कमी, आणि सैनिकांची संख्या कमी म्हणून राष्ट्राचें रक्षण करण्याची शक्ति कमी, अशी आपत्तीची परंपरा ओढवते आणि शत्रूला शरण जाण्याची पाळी येते.' या संपादकांना जर इतिहासाचें थोडेंबहुत तरी ज्ञान असतें, तर त्यांना हें माहीत असतें की फ्रान्स व जर्मनी यांमध्यें अनेक वेळां युद्धें झालेलीं आहेत. गेलें महायुद्ध हें पहिलेंच युद्ध नव्हे. नेपोलियनच्या वेळीं त्याचा सर्व यूरोपला धाक होता आणि तरी शेवटी इंग्लंड व जर्मनी एक झाल्यामुळे त्याचा पराभव झाला. १८७० सालीं जर्मनीने पुनः युद्ध करून फ्रान्सचा अतिशय मोठा पराभव केला होता, आणि याचें सर्व श्रेय जर्मन सेनापति बिस्मार्कला यावें लागतें. त्यानंतर गेल्या महायुद्धांत फ्रान्सनें इंग्लंड व अमेरिकेचे मदतीने जर्मनीचा धुव्वा उडवला, आणि आतां पुनः २५ वर्षांनी

फ्रान्सचा पुन: पराभव होत आहे. १८७० सालीं फ्रान्सचा पराभव झाला तो कां झाला ? आणि १९१८ सालीं जर्मनीचा कां झाला ! यालाहि वरील कारणेंच लागतात काय ? त्या वेळीं तर संततिनियमनाचें बंड नव्हतें ? युद्धांत जय किंवा पराजय लोकसंख्येवर अवलंबतो, ही अचरट कल्पना आजपर्यंत अनेकांनी पुढें मांडली आहे, परंतु ती खरी नव्हे हें दाखवणें कठिण नाही. ही कल्पना नवी नाही, आणि ती फ्रान्स, जर्मनी व इतर यूरोपीय देशांतहि आज बरींच वर्षे प्रचलित आहे. इतकेंच नव्हे तर संततिनियमनाचीं साधनें विकण्याविरुद्ध इतर कोणत्याहि देशापेक्षा फ्रान्समधें अधिक कडक कायदे आहेत. जास्त मुलें उत्पन्न करणारांना तेथे बक्षिसेंहि देण्याची पद्धत आहे. अशा स्थितींत फ्रान्समधेंच संततिनियमन बोकाळलेलें आहे म्हणण्यांत काय अर्थ आहे ? तें सर्वच यूरोपीय देशांत बोकाळलेलें आहे, आणि हिटलरशाहींत जर्मनींत व म्युसोलिनीच्या कारकीर्दींत इटलींत संततिनियमनाविरुद्ध जे प्रयत्न झाले त्यांचा मोठासा परिणाम झालेला नाही. फ्रान्सवर संततिनियमनाचा जास्त परिणाम झाला, याचें कारण संततिनियमनाचे फायदे फ्रेंच लोकांस सर्वांत अगोदर कळले आणि इतरांस त्यांचें आकलन होण्यास वेळ लागला इतकेंच. जर्मनीची लोकसंख्या अगोदरच जास्त होती, तेव्हा आरमारांप्रमाणेंच लोकसंख्या वाढवण्याची शर्यत जरी यूरोपांतील सर्व देशांत सुरू झाली असती, तरीदेखील अगोदरच जास्त असलेल्या जर्मनीच्या लोकसंख्येपेक्षा कितीहि प्रयत्नाने फ्रान्सची कशी जास्त झाली असती, हें केसरीकारांनीं सांगितलें असतें तर बरं होतें. हा अगदी साधा अंकगणिताचा प्रश्न आहे, आणि इतकें देखील गणित केसरीकारांना कळणार नाही अशी आमची कल्पना नव्हती. जर्मनीने मात्र संततिनियमन करावें आणि फ्रान्सने करूं नये अशी कांही युक्ति फ्रान्सला योजतां आली असती असें वाटत नाही. प्रजाजननाला नैसर्गिक मर्यादा असते, तेव्हा फ्रान्समधल्या सर्व बायकांना वर्षांतून तीनचार मुलें होत रहावीं, आणि जर्मनींत मात्र होऊं नये, अशीहि कांही युक्ति त्यांना प्रयत्नानेही सांपडली असती असें वाटत नाही. तेव्हा लोकसंख्येच्या शर्यतींत फ्रान्सला जय मिळणें अशक्य आहे, आणि शत्रूला जिंकण्याचा जर एवढाच मार्ग असेल, तर फ्रान्सला

जगाच्या अंतापर्यंत कधींहि विजय मिळणें शक्य नाही. परंतु आजपर्यंतच्या इतिहासावरून तसें दिसत नाहीं, तेव्हा केसरीकारांची ही ओरड किती फोल आहे, याची यावरून वाचकांना कल्पना येईल.

केसरीकारांनीं कोणत्याहि प्रकारचा पुरावा दिल्याशिवाय आणखीहि एक विधान ठोकून दिलें आहे की 'हें महायुद्ध उपस्थित होण्याच्या आधी फ्रान्स-मधील कारखान्यांतून मजुरांकडून कामाची टाळाटाळच होत असे. मजुरांच्या कामाचे तास कमी करतां करतां आठवड्यांत अवघे ४० तास काम घेण्यांत येऊं लागलें, आणि यामुळे फ्रान्सला जर्मनीइतकीं विमानें तयार करतां आलीं नाहीत' असें त्यांचें अनुमान आहे. मजुरांचे संप जसे सर्व जगभर होत आले आहेत, तसेच ते फ्रान्समध्येंहि होत होते, यापलीकडे मजुरांकडून कामाची टाळाटाळ होत होती ही निव्वळ थाप आहे. जर्मनींत हिटलरशाहींत मजुरांना गुलामांप्रमाणें राबवून, खायला मिळालें नाही तरी चालेल पण विमानें आणि तोफा तयार झाल्या पाहिजेत, अशा प्रकारचा जुलूम चालू आहे, तशाच रीतीने फ्रान्सनेहि जुलूम करायला पाहिजे होता, असें हे विद्वान संपादक आपल्या संपादकीय खुर्चीवरून लिहीत आहेत ! परंतु हल्लीच्या युगांत असल्या दडपशाहीला कोणीहि पाठिंबा देणार नाहीं. मजुरांनाहि कांही हक्क असतात, याची जाणीव केसरीकारांना नसली तरी इतर जगाला आतां झालेली आहे, आणि केसरीकारांच्या या भांडवलशाही ओरडीला आतां कोणी विचारणार नाही. हिटलरसारखा जुलूम जर्मनींतहि फार दिवस चालण्यासारखा नाहीं, हें चालू युद्धांत तो न मेल्यासहि निश्चितपणें दिसेल, याची तिळमात्र शंका नाही. परंतु अशा तऱ्हेचा जुलूम कायम टिकून, मजुरांवर जुलूम करून जर्मनीसारख्या राष्ट्रांकडून जर इतरांना उपसर्ग पोंचूं लागला, तर त्यांतून मार्ग म्हणून इतर राष्ट्रांनीहि तोच प्रकार सुरू करावा, हें कोणासहि मान्य होणार नाही. अशा परिस्थितींत इतर राष्ट्रांनी संघशक्तीचा प्रभाव हिटलरसारख्या लोकांना दाखवला पाहिजे, आणि या वेळीं इतरांत ही संघशक्ति व एकजूट नव्हती, म्हणून हा पराभव झालेला आहे, हें मार्शल पेतँ यांनीहि कबूल केलेलें आहे. इंग्लंड व

फ्रान्स यांनी मनांत आणलें असतें तर त्यांना जर्मनीइतकीं विमानें उत्पन्न करतां आलीं नसतीं असें नाही. परंतु त्यांनी या बाबतींत हलगर्जीपणा केला आणि जर्मनीची तयारी किती आहे याची धड बातमीहि त्यांना मिळवतां आली नाही. मुत्सद्देगिरी, गुप्त तयारी, आणि शत्रुपक्षांत फूट पाडून आपलें काम साधण्याची कला, यांत जर्मनीने यावेळीं अधिक कर्तबगारी दाखवल्यामुळे त्यांना फ्रान्सवर जय मिळाला. केवळ लोकसंख्या वाढवल्याने या गोष्टी साधत नाहीत. फ्रान्सला नेपोलिअनसारखा नेता मिळाला तेव्हा त्याने सर्व यूरोपला जर्जर केलें, जर्मनीला बिस्मार्कसारखा सेनापति मिळाला तेव्हा त्याने फ्रान्सचे हाल केले, आणि या वेळीं कर्तबगारींत हिटलर निःसंशय अधिक ठरला, हेंच विजयाचें खरें कारण आहे. केसरी-कारांसारखे उथळ बुद्धीचे लोकच याचें खापर संततिनियमनावर फोडूं शकतील.

विजय जर लोकसंख्येवर अवलंबता, तर हिंदुस्थानावर ब्रिटिश सत्ता कां आली असती ? शिवाजीने महाराष्ट्रांत मुसलमानांवर विजय मिळवला त्या वेळीं हिंदूंची संख्या एकदम वाढली होती काय ? हा कर्तबगारीचा प्रश्न आहे, लोक-संख्येचा नव्हे. इतकी सरळ गोष्ट देखील केसरीकारांना कळूं नये हें आश्चर्य आहे. हिंदुस्थानांत कधी संततिनियमनाचें नांवहि नव्हतें, तरमग बाहेरच्या वाटेल त्या लोकांनी येऊन हिंदुस्थानावर राज्य करावें असें कित्येक शतकें चाललेलें आहे तें कां ? हिंदुस्थानांतील सर्व साधुसंत आजपर्यंत त्यागाचाच उपदेश करीत आलेले आहेत, मग हिंदुस्थानची अशी स्थिति कां ? भरभराटींत असलेल्या देशांतील लोकांनी देखील जर सुख भोगायचें नाही, कारण त्यागाची संवय जाते, तरमग सुखसोयी करायच्या तरी कशाकरतां ? हें त्यागाचें तत्वज्ञान फोल आहे.

---

# ग्रंथपरीक्षण

**१. अतिप्रसंग** ( विनोदी लेखांचा संग्रह ) लेखक, दत्तु बांदेकर; प्रकाशक, ज. वि. परांजपे, पु. रा. भिडे आणि कंपनीसाठी, लक्ष्मी रोड, पुणें २. पृष्ठें १३८, किं. १ रु. २ आणे.

# ग्रंथपरीक्षण

मथळयाखालील ' विनोदी लेखांचा संग्रह ' ही जाहिरात पाहिल्यावर, व बावडेकरांची बोजड प्रस्तावना वाचल्यावर, आतां जांभया देत पानें उलटावीं लागणार अशी माझी अपेक्षा होती. परंतु जांभयांऐवजी हंसण्याच्या उकळ्या मात्र सारख्या येत होत्या. मराठी पुस्तक वाचतांना हा रोग क्वचितच जडतो. मराठी साहित्य रडकें आहे, त्यांत गंमत नाही, गुदगुल्या होऊन हंसूं येत नाही, अशी मी नेहमी तक्रार करीत असतें. परंतु ' अतिप्रसंगा ' सारखे प्रसंग मराठी वाङ्मयावर जर वरचेवर ओढवूं लागले, तर मला तक्रार करण्यास मुळीच जागा रहाणार नाही. तात्विक विनोद व मर्मभेदक उपहास हीं विनोदाचीं दोन्ही अंगें बांदेकरांना चांगलीं अवगत आहेत. त्यांचे आजकालचे सर्वच गुन्हेगार मोठे मजेदार आणि मार्मिक आहेत. शाळाकालेजांतून भरणाऱ्या असंख्य संमेलनप्रसंगीं या गुन्हेगारांची जबानी घेण्यासारखी आहे. नाट्यप्रिय विद्यार्थी-वर्गाला पुस्तकांतील इतर संवादहि आयत्या वाढून आलेल्या ताटाप्रमाणेच भासतील.

लेखकाचें निरीक्षण जितकें सूक्ष्म आहे, तितकीच त्याची कल्पनाशक्ति दांडगी आहे. विसाव्या शतकांतील समुद्रमंथनाची सुरवात फार सुंदर झाली आहे, परंतु रत्नें बाहेर येऊं लागतांच लेखकाने एकदम आटोपतें घेतलेलें पाहून निराशा होते. प्रत्येक रत्नाची आणखी थोडी हजेरी घेतली असती तर लेख त्रोटक वाटला नसता. महाराष्ट्रीय जनतेनें अति उगाळलेल्या गडकऱ्यांच्या मदिरामंडळाला मात्र लेखकाने हात लावला नसता तर बरें झालें असतें. शिवाय स्वतःजवळ इतकें भांडार असतांना दुसऱ्याचें घेण्याची काय जरूर ? **शकुंतला परांजपे**

**२. पूजा.** लेखक स. हृदय, महाड. प्रकाशक, शंकर वामन कुलकर्णी, संचालक, महाराष्ट्रग्रंथभांडार, गिरगांव, मुंबई. पृष्ठें ८६, किं. १० आणे.

' पूजा ' ' पुजारी ' व ' पुजारीण ' अशा तीन एकांकिकांचा हा संग्रह आहे. प्रत्येकांत वैवाहिक जीवनांतील एकेका लक्ष्याचें विवेचन केलें आहे. संसाराकडे पाहण्याची स्त्रीपुरुषांची दृष्टि किती भिन्न असते, व प्रेमविवाहाने बद्ध झालेल्या दांपत्यामध्येंहि निरंतर कलह कसे उद्भवतात, हें दाखवतांना लेखकाने

स्त्रियांच्या मनोभावनांचें विशेष कौशल्याने निरूपण केलें आहे. कांही ठिकाणीं मात्र पुरुषांचें मन लेखकाने बरोबर ओळखलें नसावेंसें वाटतें. उदा० पहिल्या कथानकांत आपलें एक मूल परपुरुषाचें आहे अशी खात्रीची समजूत झाल्यावर त्यासंबंधी कोणताही उल्लेख न करतां नवरा दीड वर्ष बायकोला घरांत बाळगील हें शक्य वाटत नाही. आतां ही कल्पना 'गी द मोपॅसां' वरून घेतल्याचें लेखकाने लिहिलें आहे, परंतु ही गोष्ट फ्रान्समध्यें कदाचित् शक्य असलीच, तरी तां निर्मला मनोहरच्या संसारांत मात्र शक्य होणार नाही. तसेंच शेवटच्या कथानकांत लिहिल्याप्रमाणे परपुरुषापासून गर्भवती झालेल्या बायकोचा गर्भपात केल्यावरहि पूर्ववत् तिच्याशीं पतीच्या नात्याने रहावयास कोणी पुरुष तयार होईलसें वाटत नाही. पूजेंतील सुरवातीची बडबड जरी कंटाळवाणी वाटते, तरी संवाद एकंदरींत चांगले आहेत. परंतु बरेच ठिकाणीं भाषा अतिशय धेडगुजरी झाली आहे. उदा० 'बुद्धीने वर्क केलें पाहिजे' (पृ. १६) 'एकादी टिपिकल केस' (पृ. १६), 'मला मॉर्टिफाइड झाल्यासारखें वाटे' (पृ. ३१)

शकुंतला परांजपे.

---

# पत्रव्यवहार.

१

'बल ज्याचें त्यास तें' (शारदा-देवल)

ब्रह्मचर्य, व्यायाम किंवा कामशास्त्र, यांपैकी बऱ्याच पुस्तकांत कोणी किती संभोग करावा यावर थोड्याबहुत ओळी असायच्याच असें दिसतें, आणि त्यांतही एकाचा मेळ दुसऱ्याशीं नाही. ज्याला थोडें तारतम्य आहे, त्याला आहार-विहार यांबाबत दुसऱ्याचे उपदेशाची आवश्यकता नसावी, कारण तो जाणूनबुजून आपल्या अवसानापेक्षा अतिरेक करील असें वाटत नाही, आणि

मानसिक हव्यास असला तरी देह कार्यक्षम होईलच असें वाटत नाही, आणि ज्याची पचनक्रिया उत्तम आहे (जठराग्नि प्रदीप्त आहे) त्याला थोडें खा म्हणून सांगून काय उपयोग ? तसेंच ज्याची कामशक्ति उत्तम आहे, वासना प्रबल आहे, आणि परिस्थिति अनुकूल आहे, त्याला संयमाचा उपदेश करून काय साध्य होणार ? तेव्हा विचारांतीं 'बल ज्याचें त्यास तें' हेंच ठीक दिसतें. या बाबतींत नवतरुणांना व ज्यांनी ही मर्यादा ओलांडली त्यांना आपण काय सुचवूं शकतां ? 'पंढरपूरकर'.

**उ.** आपलें म्हणणें ठीक आहे. ज्यांनी अतिरेक केला असेल त्यांना सामान्यतः उपदेश म्हणजे अतिरेक सोडून द्यावा आणि आरोग्याचे सामान्य नियम, म्हणजे मिताहार, मितव्यायाम, शक्य तितका वेळ मोकळ्या हवेंत घालवणें, जरूर तितकी विश्रांति घेणें, वगैरे. **सं.**

२

सुखाचे शोधाची दुसरी बाजू

येथे तूर्त सुखाचा शोध हा बोलपट चालू आहे, तो पाहून या बोलपटाची दुसरी बाजू म्हणून पुढीलप्रमाणे कथानक व्हावें. धनंजय ( हा उच्च विचार व पवित्र आचाराचा दाखवून ) व माणिक यांचें एकमेकांवर प्रेम असूनहि माणिकचें लग्न आनंदाबरोबर होतें. त्यामुळे धनंजय उदास होऊन लोकसेवा करीत ब्रम्हचर्याने राहतो. हे उभयतां एकमेकांस विसरत नाहीत. माणिक-आनंदाचा संसार खटाखटीचाच चालू होतो. पुढे आनंद आपलें शारीरिक व्यंग लक्षांत घेऊन (लंडन येथील बऱ्या लोकांचीं गुप्त कृत्यें, यांतील बडा सरदार आपलें व्यंग जाणून आपल्या पत्नीचे सुखाकरतां एका खुनी इसमास आश्रय देतो त्याप्रमाणे ) आणि धनंजय-माणिक यांचा पूर्वापार संबंध जाणून त्या उभयतांना एकत्र राहण्याची सल्लायुक्त परवानगी देतो. ही मध्यवर्ती कल्पना घेऊन चित्रीकरण व करमणुकीकरतां कमीअधिक करावें. 'पंढरपूरकर'

**उ.** या धर्तीवर एक गोष्ट या मासिकांत आलेली आहे, परंतु अशा

तऱ्हेचा बोलपट हातांत घेण्यास सिद्ध होणारा बोलपटनिर्माता हिंदुस्थानांत सांपडेल असें वाटत नाही. **सं.**

३

पुढील माहिती आमच्या वाचनांत आलेली आहे, तिजवर आपला अभिप्राय देण्याची विनंति आहे. इंग्लंडमध्यें 'मॅरेज ब्यूरो' नांवाची एक संस्था आहे. तिच्या चालक मिसेस होडसन आहेत. प्राणि–वनस्पति शास्त्रांच्या त्या प्रोफेसर आहेत. वरील संस्थेंत अनेक डाक्तर, वैज्ञानिक, मानसशास्त्राचे प्रोफेसर, काम करीत आहेत. १ आपलीं लग्नें यशस्वी होतील की नाही याकरतां पुष्कळसे स्त्रीपुरुष मॅरेज ब्युरोचा सल्ला घेतात. ज्यांना सल्ला घ्यायचा असतो, त्यांनी आपला वंश, आपण, व आपले आईबाप, यांचे स्वभाव, प्रकृति, व्यंगें आवडी-निवडी वगैरे सर्व गोष्टींची माहिती द्यावी लागते. मिसेस होडसन व त्यांचे सहकारी या सर्व बाबींचा अभ्यास करतात व त्यावरून भावी वधूवरांचे स्वभाव एकमेकांस अनुकूल आहेत की नाही याचा निर्णय देतात. अशा संस्थेपासून खरोखर फायदा होतो काय ? २. विशेषतः मुलीला व्यभिचाराचें व्यसन तिच्या मातेकडून वारशांत मिळतें. ज्या स्त्रीची माता व्यभिचारिणी असते, तिच्या मुलींत विलास, व्यभिचार एका अथवा दुसऱ्या स्वरूपांत दिसून येतो, असें मिसेस् होडसनचें ठाम मत आहे. यावर आपलें मत काय आहे ? आपला, चिमणलाल जी. शहा, शहापूर (ठाणें).

**उ. १.** आईबापांच्या स्वभावांची संपूर्ण माहिती असली तरीदेखील मुलांचे स्वभाव त्यावरून सांगतां येणार नाहीत. तसे सांगतां आले असते तर सर्व भावांचे आणि बहिणींचे स्वभाव सारखेच झाले असते. तसे ते नसतात यावरूनच हें उघड होतें. **२.** व्यभिचाराचे बाबतींत तर कधीच कांही सांगतां येणार नाही. व्यभिचाराचीं कारणें वेगवेगळीं असतात. एखादी स्त्री एका परिस्थितींत व्यभिचार करणार नाही, पण परिस्थिति बदलल्यास तीच स्त्री व्यभिचार करील. कांही मानसिक प्रवृत्ति आनुवंशिक असतात हें खरें, परंतु व्यभिचार हा समाजाने

उत्पन्न केलेला एक कृत्रिम गुन्हा आहे, तो आनुवंशिक कसा असणार ? समागमाची कमीअधिक प्रवृत्ति आनुवंशिक असूं शकेल, परंतु आईबापांचे कोणते गुण कोणत्या मुलांत उतरतील हें कधीच निश्चित नसतें. तेव्हा आई व्यभिचारी असली किंवा नसली तरी त्यावरून मुलीसंबंधी कांहीच अनुमान काढतां येणार नाही. पतिव्रतेची मुलगी देखील व्यभिचारिणी होऊं शकेल. या संस्थेचा मुळीच उपयोग होणार नाही असें नाही, परंतु मिसेस होडसन म्हणतात त्यांत तथ्य दिसत नाही. **सं.**

## ४.

१. वात्स्यायनाच्या कामसूत्राचें मराठी भाषांतर आहे का ? २. माझ्या एका मित्राने दोन वर्षांपूर्वी लग्न केलें. महिन्यांतून सरासरी सहासात वेळां समागम होत असे, त्यांनी संततिनियमनाचीं कोणतींहि साधनें वापरलीं नाहींत, असें असूनहि दोन वर्षांत गर्भधारणा झाली नाही. परंतु आतां नुकतीच गर्भधारणा झाली. याला कारण काय ? गर्भधारणा केवळ दैवाधीन आहे का ? ३. प्रथमसमागमाचे वेळीं संततिनियमनाचीं साधनें वापरतां येत नाहीत, तेव्हा प्रथमसमागमामुळेच गर्भधारणा झाल्यास उपाय काय ? अशी गर्भधारणा होण्याचा संभव कितपत असतो ? ४. नवऱ्यापेक्षा बायको कमींतकमीं व जास्तींत जास्ती किती वर्षांनी लहान असणें इष्ट आहे ? तसें नसल्यास काय तोटे होतात ? माझा एक मित्र आपल्यापेक्षां दहा महिन्यांनी मोठ्या मुलीबरोबर लग्न करणार आहे. या लग्नामुळे त्या दोघांना विषयसुख मिळेल किंवा नाही ? मूल होईल की नाही ? विषयसुख न मिळाल्यास दोघांपैकी कोणाला जास्त त्रास होईल ? अशीं लग्नें होणें इष्ट आहे का ? ५. लग्नापूर्वी वधूवरांनी ( एकाच डाक्तराकडून ) तपासून घेणें फायद्याचें आहे का ? का तपासून घेण्याची जरूरी नाही ? तीं दोघें लग्नास योग्य आहेत की नाही, आणि त्यांना एकमेकांपासून विषयसुख मिळेल कीं नाही, आणि त्यांना मूल होईल की नाहीं, हें डाक्तर सांगूं शकेल का ? ६. लठ्ठ स्त्री आणि बारीक नवरा असल्यास विशिष्ट फायदे किंवा तोटे काय होतात ? ७.

आपले मतें सकाळ ही समागमास सगळ्यांत उत्तम वेळ आहे. यानंतर पुनः झोप घेणें आवश्यक आणि चांगलें आहे का ? ८. वात्स्यायनकामसूत्रांतील किती विधानें खरीं आहेत ? एकंदरींत ग्रंथ कसा आहे ? ९. लग्नापूर्वी स्वप्नावस्था झाल्याने जितका त्रास होतो, त्याच्या दुप्पट किंवा तिप्पट वेळां लग्नानंतर समागम झाल्यानेहि तितका त्रास होत नाही याचें कारण काय ? १०. माझें वय २२ वर्षांचें असून गेल्या चार वर्षांत महिन्यांतून तीनचार वेळां स्वप्नावस्था होते. मला कोणताहि आजार नाही, परंतु वयाच्या व उंचीच्या मानानें वजन व शक्ति थोडी कमी आहे. मी लग्न केल्याने फायदा होईल काय ? मी लग्न कोणत्या वर्षी करावें ?

उ. १. मराठी भाषांतर आमचे पाहण्यांत नाही. २. शास्त्रीय ज्ञानाच्या सध्यांच्या स्थितींत गर्भधारणा दैवाधीन आहे असेंच म्हणावें लागतें. ३. प्रथम-समागमाचे वेळीं कोणतींच साधनें वापरतां येत नाहीत असें नाही. पुरुषांस पिशवी वापरतां येते आणि तींतच थोडी जेली घातल्यास संततिप्रतिबंध होईल. प्रथम समागमाने पुष्कळ वेळां संतति होते. ४. याबद्दल मतभेद आहे, आणि वास्तविक नियम असा कांहीच सांगतां येणार नाही. अमुक वयाचे तरुण व तरुणी घेतल्या तर त्यांची शारीरिक स्थिति सारखी नसते. दोघेंही तरुण आहेत तोंपर्यंत स्त्री मोठी असली तरी कोणतीच अडचण नाही. मूल होणें यावर अवलंबत नाही. स्त्री मोठी असल्याने अडचण इतकीच उत्पन्न होते की स्त्रीचें तारुण्य लवकर संपतें, अशा वेळीं पुरुष अजून तरुणच असतो; यामुळे त्याचें समाधान होत नाही. आणखी एक व्यावहारिक अडचण म्हणजे नवऱ्यापेक्षा बायको जितकी लहान असेल त्या मानाने नवऱ्याला आपला ताबा चालवायला सोपें जातें. स्त्री मोठी असल्यास ती नवऱ्याचें तितक्या सहज ऐकणार नाही. एकंदरींत अशा विवाहांपासून असमाधान वाढेल. ५. तपासुन घेणें एकंदरींत बरें. एकमेकांपासून विषयसुख मिळेल की नाही आणि मूल होईल की नाही, हें डाक्तरांस नक्की सांगतां येणार नाही. ६. कांही मर्यादेपलीकडे लठ्ठपणाची अडचण होण्याचा संभव आहे. ७. झोप घेणें जरूरच आहे असें नाही, परंतु घेण्यास हरकत नाही.

८. याचें गणिती उत्तर देण्याकरतां लागणारा हिशोब केलेला नाही. ग्रंथ शास्त्रीय पद्धतीचाच आहे, परंतु त्या वेळीं आतांइतके ज्ञान नव्हतें यामुळे कांही चुकीचीं विधानें सांपडतात. ९. लग्नापूर्वीचा बराचसा त्रास मानसिक असतो आणि शिवाय आरोग्याचे दृष्टीने समागम अधिक हितावह आहे. १०. मनुष्य समागमक्षम झाला म्हणजे समागमास हरकत नाही असें आधुनिक मत आहे. त्यांतून जे कांही वर्षे ब्रह्मचर्य पाळावें असें म्हणतात, तेहि २२ चे पुढे पाळणें हितावह नाही असेंच म्हणतात. तेव्हा कोणत्या वर्षी लग्न करावें हा केवळ व्यावहारिक प्रश्न राहिला. तो ज्याचा त्याने सोडवायचा आहे. **सं.**

---

# शारदेचें पत्र

पूर्णिमेच्या २२ मेच्या अंकांत दारूबंदीबाबत ‘ टाइम्स ’ ला उत्तर देण्याचा जो प्रयत्न **बड्या दादा**ने केला आहे त्यांत तो कसा सपशेल घसरला आहे हें पाहून मला हंसूं येतें. ‘ पूर्णिमा ’ हें कांग्रेसच्या तर्फेचें पत्र असल्यामुळे गांधींच्या धार्मिक अत्याचारांना त्यांत पाठिंबा असणार हें उघड आहे, परंतु ह्या-करतां युक्तिवादाचा केवळ आभास उत्पन्न करण्यापलीकडे गांधींच्या अनुयायांना कांही करतां येत नाही यांत मोठेंसें नवल नाही. कोणावरहि सक्ती किंवा जुलूम करणें हें लोकशाहीच्या तत्वाना धरून नाही, असें टाइम्सने म्हटलें आहे ही अर्थातच टाइम्सची चूक आहे. गांधींचा आणि लोकशाहीचा संबंध काय ? गांधी-शाही ही हिटलरशाही आहे, नव्हे गांधी म्हणजे सवाई हिटलर आहेत, असें त्यांचेच अनुयायी मोठ्या अभिमानाने सांगत असतात. तेव्हा गांधीशाहींत जुलूम हा व्हायचाच, त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीच नाही, हें टाइम्सच्या लक्षांत आलें नाही ही टाइम्सची चूक आहे.

पण ही चूक उघडपणें दाखवतां येत नाही, कारण आम्ही लोकशाहीचीं तत्वें देखील मानतों असेंहि कॉंग्रेसवाल्यांचें एक ढोंग आहे. अर्थात् गांधीशाही

आणि लोकशाही या दोन गोष्टी विसंगत आहेत असें कोणी म्हणेल, पण गांधींना विसंगतीची मुळीच परवा नसते. साहजिकच आहे, हिटलरला कोठे विसंगतीची परवा आहे ? गांधी तर स्पष्टच सांगतात की आपल्या बोलण्याचालण्यांत कांही संगति असावी हें म्हणणेंच मूर्खपणाचें आहे.

तेव्हा दारूबंदीचें समर्थन करण्याकरतां बड्या दादाने जें उदाहरण घेतलें आहे, त्याने टाइम्सची फजीति झाली अशी त्याची कल्पना आहे, पण ती सपशेल चुकीची आहे. बडा दादा म्हणतो, आत्महत्या ही वैयक्तिक बाब असूनहि आत्महत्येविरुद्ध जर कायदा करणें योग्य ठरतें, तर त्याच तत्वावर दारूबंदीहि करतां येते, कारण जीव द्यायचा प्रयत्न करणें हा जर गुन्हा होत असेल तर दारू पिऊन जिवंत असून मेल्यासारखें होणें ही एक प्रकारची नैतिक आत्महत्या असल्यामुळे तोही गुन्हा मानणें भाग आहे. अशा तऱ्हेने उपमा, उत्प्रेक्षा वगैरेंच्या साह्याने दोन गोष्टींत बादरायण संबंध जोडून आपलें म्हणणें सिद्ध करूं पाहणें हा युक्तिवाद नव्हे, तर्कशास्त्रांत याचें बिलकुल महत्त्व नाही. तथापि त्यांनी दिलेल्या उदाहरणावरूनच त्यांचें म्हणणें खोडून काढतां येईल. आज जगांत अस्तित्वांत असलेले सर्व कायदे चांगले किंवा न्याय्य आहेत असा आग्रह मला वाटतें 'बडा दादा' देखील धरणार नाही. त्यांतल्या त्यांत आत्महत्येचा कायदा इतका हास्यास्पद आहे की तो बदलण्याचे प्रयत्न यूरोपांत आज कित्येक वर्षें चालू आहेत. काय म्हणे, आत्महत्या हा गुन्हा आहे, आणि तो गुन्हाहि असा की तो यशस्वी झाला तर त्याला शिक्षा नाही, आणि गुन्ह्याचा प्रयत्न फसला तर मात्र त्याला शिक्षा आहे ! हा काय कायदा आहे की सोंग ? कोणी कदाचित् असेंहि म्हणेल की चोरी यशस्वी झाली, म्हणजे चोरी करून ती सांपडली नाही, तर मात्र शिक्षा होत नाही, सांपडली तर मात्र होते, तसेंच हें. पण चोरी यशस्वी झाली तर गुन्हेगार सांपडत नाही म्हणून त्याला शिक्षा करणें शक्य नसतें. पण आत्महत्येचा गुन्हेगार सांपडलेलाच असतो, तरी त्याला शिक्षा होत नाही. कोणी म्हणेल की तो मेल्यामुळे त्याला शिक्षा करतां येत नाही, पण तेंहि खरें

नाही. शिक्षा अनेक प्रकारच्या असतात. मेलेल्या मनुष्याला शारीरिक शिक्षा करतां येणार नाही, पण दंड करतां येईल, मालमत्ता जप्त करतां येईल. परंतु तसें कांही होत नाही.

सारांश आत्महत्येचा कायदा दारूबंदीइतकाच रानटी आहे, हास्यास्पद आहे. एखादा मनुष्य जिवाला कंटाळला, तर त्याला हाल अपेष्टा सोसून जगायला लावण्याचा कोणाला काय अधिकार आहे ? हा कायदा बदलून त्या-ऐवजी कोणाला आत्महत्या करणें असल्यास ती कारण सांगून उघडपणें करतां यावी, असें पुष्कळ समंजस लोकांचें म्हणणें आहे. याकरतां सरकारने एक समिति नेमावी आणि कोणाला आत्महत्या करणे असल्यास त्याने समितीस कारणें सांगून अर्ज करावा, आणि तीं अपरिहार्य नसल्यास तीं समितीने शक्य तर दूर करावीं, परंतु त्याला जबरीने जगायला लावूं नये, अशी एक सूचना या बाबतींत केलेली आहे, आणि ही अत्यंत समंजस आहे. अशा हास्यास्पद कायद्याचें उदाहरण देऊन दारूबंदीचें समर्थन होणार नाही.

एच्. जी. वेल्स यांनी आपल्या 'द न्यू वर्ल्ड ऑर्डर' नांवाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत नव्या जागतिक व्यवस्थेंत मनुष्याचे सर्वांत महत्वाचे हक्क कोणते असावे याचा एक मसुदा तयार केला आहे. त्यांत ते म्हणतात 'मनुष्याला जुलमाने अन्न घालतां नये, उपोषण करून मरण्याची त्याची इच्छा असेल तर त्याला तसें मरूं दिलें पाहिजे.' आत्महत्या हा गुन्हा असेल तर हा गुन्हा करण्याची धमकी गांधींनी अनेक वेळां दिलेली आहे. बऱ्या दादाचे मताने बहुधा गांधींना मात्र गुन्हे करण्याची परवानगी असावी.

दारूबंदीच्या धर्तीवर कायदे करणें असेल तर आणखी अनेक कायदे करावे लागतील. बरेच लोक फाजील खाल्ल्याने आजारी पडतात, तेव्हा त्यांच्या हिताचे दृष्टीने कोणालाहि अमुक इतक्या अन्नापेक्षा जास्त मिळतां नये अशी व्यवस्था करावी लागेल. असें केल्याने कांही लोकांच्या हिताकरतां सर्वांची गैरसोय होईल, पण तशीच दारूबंदीनेहि होते, तेव्हा हा कायदा रास्तच होईल.

दारूबंदीचा कायदा इतका मूर्खपणाचा आहे की आज आजारी माणसांना डाक्त-रांचे परवान्यावरुन देखील 'इन्व्हॅलिड् पोर्ट' या नांवाने प्रसिद्ध असलेलें, विशेषतः आजाऱ्यांस लागणारें मद्य मिळणें अशक्य झालें आहे. कारण कायद्याने डाक्तरांच्या परवानगीने फक्त ब्रँडी, रम किंवा शँपेन मिळूं शकतात. केमिस्टच्या दुकानांत हे तीनच प्रकार डाक्तरच्या शिफारशीने मिळतात, आणि दारूचे दुकानांत गेल्यास हें मद्य तेथें असतें, पण तें फक्त दारूचा सामान्य परवाना असेल तरच मिळतें.

याच धर्तीवर, वस्तऱ्याने आत्महत्या करतां येते, किंवा दुसऱ्याचाहि गळा कापतां येतो, आणि कांही लोक तसें करतातहि, हें माहीत असल्यामुळे कोणा-लाहि वस्तरा बाळगण्याचा हक्क नसावा. इतकेंच काय, लाठी, चाकू, वगैरे सर्व प्रकारच्या हत्यारांना बंदी असावी, आणि ती केवळ दंग्याची भीति असेल तेव्हाच नव्हे, तर अशी कायमची बंदी करावी. त्याने समाजाचें फार मोठें हित होणार आहे. कांही लोक दारू पिऊन झिंगतात, म्हणून सर्वांना दारूबंदी केली, तेव्हा त्याच तत्वावर आधारलेला हा कायदा आहे. काठीशिवाय ज्यांना चालतां येत नाही, त्यांनी डाक्तराचें सर्टिफिकीट आणल्यास त्यांना मात्र परवानगी मिळेल. ही परवानगी दरवर्षी नवीन घ्यावी लागेल व तीबद्दल फी पडेल. शिवाय डाक्तर कधी कधी खोटीं सर्टिफिकिटें देतात, तेव्हा ज्यांना परवाना पाहिजे असेल त्यांनी आपल्या डाक्तराला घेऊन सरकारी डाक्तरांच्या समितीपुढे हजर राहून आपली काठीची गरज सिद्ध केली पाहिजे. त्यांत काठीशिवाय आपल्याला चालतां येत नाही इतकेंच सिद्ध करून भागणार नाही, तर वेळ पडल्यास ती काठी आपल्याला कोणाच्याहि डोक्यांत घालतां येणार नाही असेंहि सिद्ध करावें लागेल, कारण हा कायद्याचा मुख्य उद्देश आहे. ते कसें सिद्ध करायचें हा प्रश्न सरकारचा नाही, तें सिद्ध केल्याशिवाय परवाना मात्र मिळणार नाही.

'सख्या हरी'ची तरफदारी करण्याकरतां मालतीबाई तेंडूलकरांनी जो लेख 'चित्रा' मधें लिहिला आहे तो वाचून मला आश्चर्यच वाटलें. त्यांत जो

फाजीलपणा असतो, त्याबद्दल माझें कांही म्हणणें नाही. ज्यांत खरा विनोद असेल त्यांत थोडा फाजीलपणाहि खपतो. पण पुष्कळ वेळां त्यांत विनोद नसून जागा भरून काढण्याकरतां केलेला नुसताच आचरटपणा असतो. यामुळे मी तें पान वाचण्याची देखील तसदी पुष्कळ वेळां घेत नाही. असल्या आचरटपणाने मुली प्रेमापासून निवृत्त होतात हें मला खरें वाटत नाही. देश गुलामगिरींत असला म्हणून प्रणयाला विष कां म्हणावें हें मला समजत नाही, किंवा त्याला 'लूत लागलेला प्रणय' वगैरे शिव्या देण्याचेंहि कारण दिसत नाही. देश संकटांत आहे म्हणून कोणी जेवण सोडलें नाही, त्याचप्रमाणे इतर नैसर्गिक गोष्टीहि कोणी सोडीत नाही. ललितवाङ्मयांतलें प्रेम आत्तांच उत्पन्न झालें आहे असें नाही, आणि तें आतांच त्यांतून काढून टाकण्याचें कारण दिसत नाही. मनुष्येतर प्राण्यांत या बाबतींत वैयक्तिक आवडनिवड फारशी नसते आणि मनुष्यांतहि ती अली-कडेच उत्पन्न झालेली आहे, म्हणून ती कोणत्याहि प्रकारें वाईट आहे असें ठरत नाही. हें मनुष्याचें वैशिष्टय आहे, म्हणजे माणुसकी आहे. त्यांत कांही कोणाचें बिघडत नाही. हल्लीच्या पिढीची कींव करण्याइतक्या मालतीबाई म्हाताऱ्या झाल्या असतील असें वाटत नाही, परंतु ही निःसंशय म्हातारपणची विचारसरणी आहे, आणि त्यांनी ती कोणातरी म्हाताऱ्यांकडून उचलली असली पाहिजे. पावडर कशी लावावी हें समजलें, तर पावडर लावायलाहि कांही हरकत नाहीं, आणि त्यांत कोणाचेंहि नुकसान नाही. म्हणे कोमल बालिका स्वतःला नायिका कल्पितात! प्रत्येक वाचक किंवा प्रेक्षक जर तसेंच करीत असतो, तर यांत त्यांचा काय दोष आहे? मनुष्यावर जे जे प्रसंग येतात त्यांचे अनुरोधाने त्यांचें मन किंवा शरीर तयार होत असतें. ज्यांच्यावर लढ-ण्याचा प्रसंग येईल ते लोक लढाऊ होतात. केवळ लाठी फिरवायला शिकून कोणीहि लढवय्या होत नाही. आणि आमच्या लढाऊ पूर्वजांनी काय केलें? असलेलें राज्य ते घालवून बसले हेंच केलें की नाही? त्यांच्या छात्या तर वीस इंची नव्हत्या ना? हल्लीच्या मुलांची छाती जर बारीक असली, तर त्यांना पुरेसें खायला मिळत नाही, किंवा काय खावें हें कळत नाही, हें त्याचें

खरें कारण आहे. याची माहिती त्यांना दिली पाहिजे आणि याचकरतां हल्ली युनिव्हर्सिटीने वैद्यकीय तपासणीची व्यवस्था केलेली आहे. पण त्याचा फायदा घेण्याइतकी अक्कल देखील पुष्कळांना नसते. ही ललितवाङ्मयाची चूक नाही किंवा 'सख्या हरी' वाचल्यानेही त्यांत कांही फरक होणार नाही.

या सदराने स्त्रियांची बदनामी होवो की न होवो, बांदेकर स्त्रियांचे द्वेष्टे आणि तिरस्कर्ते आहेत हें त्यांच्या लिखाणावरून सहज समजण्यासारखें आहे. अशा लिखाणाची मालतीबाई स्तुति करतात हें आश्चर्य आहे. किंवा फड-क्यांच्या आणि वरेरकारांच्या विरुद्ध लिहिण्याकरतां त्यांना बांदेकरांची स्तुति करावी लागली असें तर नसेल ?

तुझी **शारदा**

---

**दारूबंदी खलास ?** कांग्रेसनें केलेली दारूबंदी बेकायदा ठरली, त्या-नंतर गव्हर्नरसाहेबांनी कांग्रेसची दडपशाही चालू ठेवण्याचा प्रयत्न केला, पण तोहि १ जुलै रोजीं हायकोर्टाने बेकायदा ठरवला. तरी बरें कीं मुंबईच्या मंत्रिमंडळांत इतके कायदेपंडित होते ! पण हातांत सत्ता आल्यावर तिच्या नशेपुढें दारूची नशा काय ? गांधींच्या नीतीच्या कल्पना लोकांवर लादण्यापूर्वी कांहीं कायद्याचा आधार लागतो याची अंधुक कल्पना त्यांना होती, पण आपण करूं तोच कायदा या घमेंडीवर जाऊन त्यांनी लोकांवर अत्याचार केला. अर्थात् हा केवळ कायद्याचा प्रश्न नाहीं. हा सर्व प्रकार जरी कायदेशीर झाला असता, तरी तो अत्याचारच झाला असता, आणि कायद्याने देखील अत्याचार करतां येतो इतकेंच त्याने सिद्ध झालें असतें. अजून तरी सरकारला न्याय-बुद्धि सुचो म्हणजे झालें. अमेरिकेंत हा अत्याचार धार्मिक लोकांनीं कायदे-शीर रीतीनेच केला होता. गेल्या अकरा महिन्यांच्या अवधींत या बेकायदा कायद्याने अनेक लोकांचे हाल केले आहेत. आतां तो बेकायदा ठरल्यावर तरी त्यांना काय मोबदला मिळणार आहे ?

---